**Date: 06.04.2026**
**Place: New Delhi**

***Leading the Power Sector***



Nazara

## NAZARA TECHNOLOGIES LIMITED

**CIN: L72900MH1999PLC122970**
**Regd. Office:** 11th Floor, Avighna House, Dr. A.B. Road, Worli, Mumbai - 400018. **Tel.**:+91-22-40330800
**Email:** investors@nazara.com | **Website:** www.nazara.com

**NOTICE OF EXTRA-ORDINARY GENERAL MEETING**

**NOTICE** is hereby given that the Extra-Ordinary General Meeting ("EGM") of the members of **NAZARA TECHNOLOGIES LIMITED** (the 'Company') will be held through Video Conferencing / Other Audio Visual Means ("VC / OAVM") on **Friday, May 01, 2026 at 11:30 A.M. (IST)**, in compliance with all the applicable provisions of the Companies Act, 2013 and the Rules made thereunder and the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with all applicable circulars in this regard issued by the Ministry of Corporate Affairs ("MCA") and the Securities and Exchange Board of India ("SEBI"), to transact the businesses that will be set forth in the Notice convening the EGM.

The Notice of the EGM (i) will be sent electronically through e-mail to all the Members of the Company, whose email addresses are registered with the Company / Registrar & Transfer Agents ('RTA') / Depository Participant(s) (ii) will also be uploaded on the Company's website at (www.nazara.com), websites of the Stock Exchanges i.e., BSE Limited (www.bseindia.com) and the National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) and on the website of Central Depository Services (India) Limited ("CDSL") (www.evotingindia.com). Members can attend and participate in the EGM through the VC/OAVM facility only. The instructions for attending the EGM through VC/OAVM will be provided in the Notice of the EGM. Members attending the EGM through VC/OAVM shall be counted for the purpose of reckoning the quorum under Section 103 of the Companies Act, 2013.

**In case if you have not registered your email ID please follow the below process for registering your email ID:**

1. Members holding shares in physical mode (if any) are requested to register / update their contact details including the details of email IDs by submitting the requisite Form ISR-1 along with the supporting documents to MUFG Intime India Private Limited, Unit: Nazara Technologies Limited, C-101, 1st floor, 247 Park, Lal Bahadur Shastri Marg, Vikhroli (West), Mumbai - 400083, RTA of the Company or at rnt.helpdesk@in.mpms.mufg.com. The said form is available on the website of the Company at https://investors.nazara.com/investor-information#three and on the website of RTA at https://web.in.mpms.mufg.com/KYC-downloads.html.
2. Members holding shares in dematerialized mode are requested to register/ update their email IDs and contact numbers with the Depositories through their respective Depository Participant(s).

**Manner of casting vote(s) through e-voting:**

Members may note that they have opportunity to cast their vote on the businesses that will be set forth in the Notice of the EGM of the Company through e-voting system. The manner of 'remote e-voting' and 'e voting' during the EGM for members holding shares in physical mode, dematerialization mode and for members who have not registered their e-mail addresses will be provided in the Notice of the EGM.

Members are requested to carefully read the Notice of the EGM, and in particular, instruction for joining the EGM and the manner of casting vote through remote e-voting or e-voting during the EGM.

**By order of the Board of Directors**
**Nazara Technologies Limited**
**Sd/-**
**Arun Bhandari**
**Company Secretary & Compliance Officer**
**M. No. F8754**

**Date : April 06, 2026**
**Place : Mumbai**

# मुंबई-विजयदुर्ग रो-रो सेवा महिनाभरातच स्थगित

*(पान १ वरून)* जहाज सोडण्यात येऊ लागले. गुरुवार आणि रविवार विजयदुर्ग बंदरावरून दुपारी १२ वाजता जहाज सोडण्यात येऊ लागले. या सेवेमुळे मुंबई ते विजयदुर्ग प्रवास सहा ते सात तासांत करता येऊ लागला. मात्र ही सेवा सुरू झाल्यावर काही दिवसांत ती स्थगित करावी लागली. विजयदुर्गहून मुंबईला येत असताना समुद्रातील तरंगत्या कचऱ्यामुळे जहाजाच्या इंजिनमध्ये बिघाड झाला. चारपैकी तीन इंजिन काम करत नसल्याने त्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक होते. त्यामुळे मुंबई ते विजयदुर्ग रो-रो सेवा काही काळासाठी स्थगित करण्यात आल्याचे सागरी मंडळाने सांगितले. दुरुस्ती करण्यासाठी १० दिवसांचा अवधी लागणार आहे.

# बंगालमध्ये लाभासाठी भाजपकडून आरक्षणाची खेळी?

*(पान १ वरून)* आवाहन केले होते. मात्र या पत्राला तसेच सर्वपक्षीय बैठकीच्या मागणीला केंद्र सरकारने प्रतिसाद दिलेला नाही. १६ ते १८ या दिवसांमध्ये महिला आरक्षण कायद्यातील घटनादुरुस्तीचे विधेयक संसदेत मांडले जाणार असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

**विरोधकांकडून आक्षेप**

'नारी शक्ती वंदन अधिनियम' कायद्यातील दुरुस्तीच्या वेळेवर प्रामुख्याने तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी शंका उपस्थित केली आहे. पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेस व भाजप यांच्यातील लढाई तीव्र झाली असून ,दोन्ही पक्षांसाठी महिला मतदार निर्णायक असल्याने त्यांना आकर्षित करण्याचे प्रयत्न या पक्षांकडून केले जात आहेत. भाजपने मध्य प्रदेश, महाराष्ट्र, बिहार या राज्यानंतर पश्चिम बंगाल निवडणुकीतही महिला मतदारकेंद्रित प्रचाराच्या रणनीतीवर भर दिला आहे. यापूर्वी झालेल्या राज्यांतील विधानसभा निवडणुकीत लाडली बहेना वा लाडकी बहीण अशा महिलांच्या हाती रोख रक्कम देणाऱ्या रेवड्यांचा मोठा लाभ भाजपला निवडणुकांमध्ये झाला होता.

पश्चिम बंगालमध्ये महिला आरक्षणाच्या कायद्यात बदल करून निवडणूक काळातील नवी रेवडी वाटण्याचा प्रयत्न भाजप करत असल्याचा आरोप काँग्रेस व तृणमूल काँग्रेसने केला आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा प्रमुख आधार असलेल्या महिला मतदारांवरील प्रभाव कमी करण्याचा आटापिटा भाजप करत असल्याचे मानले जात आहे.

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असताना केंद्र सरकार महिला आरक्षण कायद्यात बदल करण्याचा महत्त्वाचा निर्णय कसे घेऊ शकते, असा सवाल काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव जयराम रमेश यांनी उपस्थित केला. काँग्रेस अध्यक्ष व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी विरोधी पक्षांच्या खासदारांची बैठक घेऊन रणनीती निश्चित करतील, असेही रमेश यांनी स्पष्ट केले.

२०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक संमत झाले तेव्हाच खरगेंनी या कायद्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली होती. जनगणना वा मतदारसंघांच्या फेररचनेची आवश्यकता नसते. मात्र केंद्र सरकारने जनगणनेचा व मतदारसंघांच्या फेररचनेचा आग्रह धरला. ते ३० महिने झोपून राहिले. आता विशेष अधिवेशनाचा एकमेव उद्देश केवळ राजकीय लाभ उठवणे हाच आहे. तमिळनाडू व पश्चिम बंगालमधील निवडणुकांवर प्रभाव टाकणे हाच भाजपचा प्रमुख हेतू आहे. हे अधिवेशन निवडणुकीनंतर म्हणजे आणखी १५ दिवसांनंतर बोलावता आले असते, असा आरोप रमेश यांनी केला.

# युद्धामुळे गृहबांधणी संकट

*(पान १ वरून)* सुरू राहिल्यास घरांच्या किमती ५ ते ७ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता 'बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया'चे पदाधिकारी आनंद गुप्ता यांनी व्यक्त केली.

## बांधकाम साहित्याच्या दरात वाढ



- युद्धाची झळ बसून बांधकाम साहित्याच्या दरात सध्या मोठी वाढ झाली आहे. परिणामी बांधकाम खर्च वाढण्याची शक्यता आहे.
- स्टीलच्या दरात १२ ते १८ टक्क्यांनी वाढ होऊन ते प्रति टन ७० ते ७३ हजार रुपयांवर पोहोचले आहे. युद्ध सुरू राहिल्यास हा दर ८० हजारांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.
- सिमेंट गोणीचे दर १० ते २५ रुपयांनी वाढले आहेत. ॲल्युमिनियमचे दर १२ ते २० टक्क्यांनी वाढले असून तांबे १८ ते २२ टक्क्यांनी महागल्याची माहिती 'बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया'ने दिली.



# प्रफुल्ल मुळगुंद यांचे निधन

**पुणे :** सिंहगड रस्ता येथील रहिवासी प्रफुल्ल कृष्णदेव मुळगुंद (वय ७३) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुलगे, सुना आणि नाती असा परिवार आहे. प्रफुल हे ज्येष्ठ चित्रकार व नृत्यदिग्दर्शक कृष्णदेव मुळगुंद यांचे पुत्र तर, प्रसिद्ध कवी-गीतकार वलय मुळगुंद यांचे पिता होत.

# विलीनीकरणाच्या चर्चांना शरद पवारांकडून विराम

*(पान १ वरून)* नाही, असे पवार म्हणाले.

लोकांची सेवा करण्यासाठी राजकारणात आले पाहिजे, असे सांगत पवार म्हणाले की, अजित पवार जनतेचे काम करण्यासाठी सक्रिय होते आणि त्यांचा आदर केला जात होता. पण दुर्दैवाने अपघातात त्यांचे निधन झाले. आज कुटुंबाचा प्रमुख म्हणून माझ्यावर जबाबदारी आहे. कुटुंबाचा प्रमुख भविष्यातील वाटचालीचा निर्णय घेतो, ही आमच्या कुटुंबाची परंपरा आहे. या नात्यानेच बारामती पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार उभा न करण्याचा निर्णय घेतला, असेही पवार म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी बारामती पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी काँग्रेस, शिवसेना ठाकरे गटाशी संपर्क केला होता. पण काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवार उभा केला आहे. त्याबद्दल, राष्ट्रीय पक्षांनी उमेदवार उभे करण्यात काहीही चुकीचे नाही. हा पक्षाचा निर्णय असतो व त्यांचा तो हक्कही आहे. ह्यबिनविरोधह्ण निवडणुकीची मागणी करणे चुकीचे आहे, लोकशाहीत निवडणूक लढवणे ही स्पर्धा असते. काँग्रेसने सुनेत्रा पवार यांना पाठिंबा न दिल्याबद्दल पार्थ पवार यांनी टीका केली. त्यावर, पक्ष नेतृत्वाकडे बोलण्याचा अधिकार असतो. राजकारणात वावरण्यासाठी परिपक्वतेची आवश्यकता असते, ती त्यांच्यात कितपत आहे, हे सांगू शकत नाहीत, अशी कोपरखळी शरद पवार यांनी मारली.

**लवकरच राज्याचा दौरा**

काँग्रेस व शिवसेनेच्या ठाकरे गटाने पाठिंबा दिल्यानंतर महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून शरद पवार यांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. त्यांनी सोमवारी राज्यसभेत जाऊन शपथही घेतली. न्यूमोनियामुळे महिनाभर रुग्णालयात राहिल्यामुळे शपथविधीला जाताना व्हीलचेअरचा आधार घ्यावा लागला, असे शरद पवार म्हणाले. लवकरच संपूर्ण राज्याचा दौरा करणार असल्याचेही पवारांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

**राज्यात भोंदू बाबा वाढले**

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरही शरद पवारांनी भाष्य केले. आजकाल महाराष्ट्रात बनावट बाबांची संख्या वाढत आहे. एकीकडे शाहू-फुले-आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांची चर्चा होते पण, दुसरीकडे लोकप्रतिनिधी अशा भोंदूबाबांना भेटतात. हे महाराष्ट्राच्या विचारधारेच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. कोणी किती फोन केले, हे माझ्या वाचनात आले आहे. राजकारणात आणि समाजात उच्च पदांवर असलेले अनेक लोक या प्रकरणात गुंतलेले आहेत. ही परिस्थिती महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेसाठी अजिबात चांगली नाही, असे पवार म्हणाले. मी पंढरपूरला पांडुरंगाच्या व तुळजापूरला तुळजाभवानीच्या दर्शनाला जातो. निवडणुकीवेळी कान्हेरी गावात मारुतीचेही दर्शन घेतो. पण त्याची जाहीर वाच्यता करत नाही, असे पवार म्हणाले.


**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा
**ई-निविदा सूचना**

क्षेत्रीय विद्युत अभियंता-समन्वय, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, मडगाव यांच्या वतीने कर्नाटक राज्यातील कोकण रेल्वे मार्गावरील कारवार विभागांतर्गत अस्नोटी ते ठोकूर स्थानकांदरम्यान असलेल्या बोगदे, स्थानके, प्लॅटफॉर्म, अप्रोच रोड, सर्कुलेटिंग एरिया आणि सेवा इमारती इत्यादी ठिकाणी उपलब्ध करून दिलेल्या प्रकाश व्यवस्थेच्या वार्षिक देखभाल करारासाठी अनुभवी कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत. **ई-निविदा क्र. केआर-केडब्ल्यू-ईएल-एएमसी-टी-35-2025आरटी2 दिनांक: 07/04/2026, कामाची किंमत :** ₹ 95.87 लाख (जीएसटी वगळून) दोन वर्षांसाठी, **निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ :** 29/04/2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या : www.ireps.gov.in

**सी.बी.कोरा ग्रामोद्योग संस्थान**
**खादी आणि ग्रामोद्योग आयोग**
Ministry of MSME (Govt. of India)
शिंपोली गाव, म्युनसिपल शाळेसमोर, बोरीवली (पश्चिम)
**गव्हर्मेंट सर्टिफिकेट कोर्स**
**कॅलिग्राफी कोर्स**
**रवि. १२ एप्रिल पासून प्रात्यक्षिकांसहीत प्रशिक्षण**
या कोर्समध्ये प्रथम इंग्रजी व देवनागरी फॉन्टच्या सहाय्याने बेसिक कॅलिग्राफी शिकवली जाईल. नंतर कॅलिग्राफिक डिझाइनच्या सहाय्याने ग्रीटींग कार्ड, साडी पेंटिंग, टी-शर्ट पेंटिंग, नेमप्लेट डिझाईनिंग इत्यादी शिकविले जाईल. **५ रविवार**
**हेमंत 9892798130**
**वाक्कर 8169715653**

**Nazara**
**नझारा टेक्नॉलॉजीस लिमिटेड**
सीआयएन: L72900MH1999PLC122970
**नोंदणीकृत कार्यालय:** ११ वा मजला, अविघ्न हाऊस, डॉ. ए. बी. रोड, वरळी, मुंबई - ४०००१८ **संपर्क:** ९१-२२-४०३३०८००
**ईमेल:** investors@nazara.com, **संकेतस्थळ:** www.nazara.com

**विशेष सर्वसाधारण सभेची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, **नझारा टेक्नॉलॉजीस लिमिटेड** ('कंपनी') च्या सदस्यांची विशेष सर्वसाधारण सभा ('ईजीएम'), कंपनी कायदा, २०१३ आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांमधील सर्व लागू तरतुदी आणि कॉर्पोरेट अफेयर्स मंत्रालयाद्वारे ('एमसीए') जारी केलेल्या सर्व लागू परिपत्रक आणि भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ('सेबी') यांनी सह वाचित भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या अनुपालनामध्ये ईजीएम बोलावण्याच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या कामकाजाच्या निष्पादनासाठी **शुक्रवार, १ मे २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता (भाप्रवे)**, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे ('व्हीसी/ ओएव्हीएम') आयोजित केली जाईल.

ईजीएमची सूचना (१) कंपनीच्या सर्व सदस्यांना, ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट ('आरटीए')/डिपॉझिटरी सहभागींकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना ई-मेलद्वारे इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पाठवली जाईल (२) कंपनीच्या वेबसाइट (www.nazara.com), स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइट्स म्हणजेच बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (''सीडीएसएल'') (www.evotingindia.com) वर देखील अपलोड केली जाईल. सदस्य फक्त व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे ईजीएममध्ये उपस्थित राहू शकतात आणि सहभागी होऊ शकतात. व्हीसी/ओएव्हीएमद्वारे ईजीएममध्ये उपस्थित राहण्याच्या सूचना ईजीएमच्या सूचनेत दिल्या जातील. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत कोरमची गणना करण्यासाठी व्हीसी/ओएव्हीएमद्वारे ईजीएममध्ये उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची गणना केली जाईल.

**जर तुम्ही तुमचा ईमेल आयडी नोंदणीकृत केला नसेल तर कृपया तुमचा ईमेल आयडी नोंदणीकृत करण्यासाठी खालील प्रक्रियेचे अनुसरण करा :**

१. ज्या सदस्यांकडे प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स आहेत (असल्यास), त्यांना विनंती आहे की त्यांनी आवश्यक फॉर्म आयएसआर-१ सहाय्यक कागदपत्रांसह एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, युनिट: नझारा टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सी-१०१, पहिला मजला, २४७ पार्क, लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०००८३, कंपनीच्या आरटीएकडे किंवा rnt.helpdesk@in.mpms.mufg.com वर सादर करून, ईमेल आयडीच्या तपशिलासह त्यांच्या संपर्क तपशिलांची नोंदणी / अद्ययावत करावी. सदर फॉर्म कंपनीच्या https://investors.nazara.com/investor-information#three या वेबसाइटवर आणि आरटीएच्या https://web.in.mpms.mufg.com/KYC-downloads.html या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

२. डिमटेरिअलाइझ्ड मोडमध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी त्यांचे ईमेल आयडी आणि संपर्क क्रमांक त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी सहभागींमार्फत त्यांच्या डिपॉझिटरीजकडे नोंदणी/अद्ययावत करावेत.

**ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची पद्धत:**

सदस्यांनी नोंद घ्यावी की, त्यांना कंपनीच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या (EGM) सूचनेत नमूद केलेल्या कामकाजावर ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान करण्याची संधी आहे. प्रत्यक्ष स्वरूपात (फिजिकल मोड), डिमटेरिअलाइझेशन मोडमध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांसाठी आणि ज्या सदस्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदवलेले नाहीत, त्यांच्यासाठी विशेष सर्वसाधारण सभेदरम्यान 'रिमोट ई-व्होटिंग' आणि 'ई-व्होटिंग' करण्याची पद्धत विशेष सर्वसाधारण सभेच्या सूचनेत दिली जाईल.

सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी विशेष सर्वसाधारण सभेची सूचना, आणि विशेषतः विशेष सर्वसाधारण सभेत सामील होण्याच्या सूचना आणि विशेष सर्वसाधारण सभेदरम्यान रिमोट ई-व्होटिंग किंवा ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची पद्धत काळजीपूर्वक वाचावी.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**नझारा टेक्नॉलॉजीज लिमिटेड**
हस्ता/-
**अरुण भंडारी**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**
एम. नं. एफ ८७५४

**दिनांक : ६ एप्रिल २०२६**
**स्थळ : मुंबई**

**सिडको** शहरांचे शिल्पकार

**बोली मागविणारी सूचना**

**सिडको वळूंज महानगर येथील नगर-I, II व IV मधील तिची सर्व उपकरणे व यंत्रसामग्री यासह संप व पंप हाऊस, उद्वाहक नलिका, ईएसआरज, वितरण पद्धत समाविष्ट पाणीपुरवठा योजनेचे प्रचालन व देखभाल**

सिडको ऑफ महाराष्ट्र लिमिटेड हे खाली नमूद केलेल्या कामाकरिता ज्या बोलीदारांजवळ **पाणीपुरवठा मार्गाचे प्रचालन देखभाल** या सारखी तत्सम कामे पूर्ण केलेली आहेत व जे सिडको लि. किंवा केंद्र सरकार किंवा महाराष्ट्र राज्य सरकार व त्यांच्या योग्य वर्ग व प्रवर्गातील उपक्रमांत नोंदणीकृत आहेत व अनिवार्य पात्रता कसोट्यांची पूर्तता करीत आहेत अशा अनुभवी भावी बोलीदारांकडून **"ऑनलाईन" नग दर टक्केवारी बोली** मागवीत आहेत.

**१. कामाचे नाव : सिडको वळूंज महानगर येथील नगर-I, II व IV मधील तिची सर्व उपकरणे व यंत्रसामग्री यासह संप व पंप हाऊस, उद्वाहक नलिका, ईएसआरज, वितरण पद्धत समाविष्ट पाणीपुरवठा योजनेचे प्रचालन व देखभाल. २. सी.ए. नं. :** ०६ / सिडको / एसई (एचएसजी-I अँड एनटी) / ईई (एयूआर-II) / २०२५-२६. **३. बोलीकरिता ठेवलेली किंमत :** रु. १,०१,३३,९५८.०० (जीएसटी वगळता). **४. इ.र.ठे. :** रु. १,०२,०००/-. **५. नोंदणी वर्ग :** वर्ग-IV व त्यावरील (नागरी). **६. पूर्तता कालावधी :** ७३० (सातशे तीस) दिवस (पावसाळा धरून). **७. निविदा प्रक्रिया शूल्क :** रु. ५,९००.०० [समाविष्ट १८% जीएसटी (ना-परतावा)].

बोली कार्यक्रमासह बोली कागदपत्रे ०८/०४/२०२६ रोजी सांय.०५.०१ वा पासून **https://mahatenders.gov.in** या वेबसाइटवर उपलब्ध असणार आहेत.

**अधीक्षक अभियंता**
**(एचएसजी-I अँड एनटी)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जसंपर्क/००५/२०२६-२७

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**
म्हाडा MHADA
**म्हाडाचा घटक**

**जाहीर आवाहन**

**भारतनगर संक्रमण शिबिरातील भाडेकरू/रहिवाशांसाठी BIOMETRIC सर्वेक्षण**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत, मंडळाच्या अखत्यारीतील सर्व संक्रमण शिबिरांमध्ये वास्तव्यास असलेल्या भाडेकरू/रहिवाशांचे BIOMETRIC सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. भारतनगर संक्रमण शिबिर माहे सप्टेंबर २०२१ मध्ये तोडण्यात आल्याने तेथील रहिवाश्यांचे सद्यस्थितीत वास्तव्य नसल्याने बायोमॅट्रिक सर्वेक्षण करणे शक्य झालेले नाही.

तसेच, संबंधित रहिवाशांचे अद्ययावत पत्ते व संपर्क तपशील कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे, उपलब्ध नोंदीनुसार भारतनगर, वांद्रे (पूर्व) येथील म्हाडा संक्रमण शिबिरातील इमारत क्र. १ ते ३८ मध्ये २०२१ पर्यंत वास्तव्यास असलेल्या सर्व भाडेकरू/रहिवाशांना या जाहिरातीद्वारे BIOMETRIC सर्वेक्षणासाठी आवाहन करण्यात येत आहे.

सदर रहिवाशांनी दि. १५.०४.२०२६ ते २२.०४.२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० (दुपारी १.०० ते २.०० जेवणाची वेळ वगळता) या वेळेत, आपल्याकडील संक्रमण गाळ्याचे कागदपत्र, उपकरप्राप्त इमारतीचे कागदपत्र, ओळखपत्र, संक्रमण शिबिरात वास्तव्यास असल्याचा पुरावा तसेच म्हाडामार्फत निर्गमित सर्व कागदपत्रे घेऊन गुलजारीलाल नंदा सभागृह, तिसरा मजला, गृहनिर्माण भवन, म्हाडा कार्यालय, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ येथे BIOMETRIC सर्वेक्षणासाठी उपस्थित राहावे. प्रत्येक संक्रमण गाळ्यासाठी केवळ एका व्यक्तीचे BIOMETRIC सर्वेक्षण करण्यात येईल व संबंधित वेळापत्रकानुसार पती व पत्नी यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

जे भाडेकरू/रहिवासी खाली दिलेल्या तक्त्यातील वेळापत्रकातील दिनांकानुसार BIOMETRIC सर्वेक्षणासाठी नमूद कालावधीत उपस्थित न राहणाऱ्या अथवा प्रतिसाद न देणाऱ्या भाडेकरू/ रहिवाशांकडे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नाहीत किंवा त्यांनी संबंधित गाळ्यासाठी आपले वास्तव्य सिद्ध करण्याची इच्छा नाही असे गृहीत धरून त्यांना पुढील कार्यवाहीसाठी अपात्र घोषित करण्यात येईल व त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ - गुलजारीलाल नंदा सभागृह, तिसरा मजला, गृहनिर्माण भवन, म्हाडा ऑफिस, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

**वेळापत्रक**

| अ.क्र. | दिनांक | इमारत क्र. |
|---|---|---|
| १ | १५.०४.२०२६ | १ ते ५ |
| २ | १६.०४.२०२६ | ६ ते १० |
| ३ | १७.०४.२०२६ | ११ ते १७ |
| ४ | १८.०४.२०२६ | १८ ते २२ |
| ५ | २०.०४.२०२६ | २३ ते २७ |
| ६ | २१.०४.२०२६ | २८ ते ३२ |
| ७ | २२.०४.२०२६ | ३३ ते ३८ |

सही/-
**उपमुख्य अधिकारी/संगा**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई**

Follow us: @mhadaofficial
सीपीआरओ/ए/२५६
**म्हाडा- गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**

**बँक ऑफ इंडिया म्युचुअल फंड**
**(गुंतवणूक व्यवस्थापक: बँक ऑफ इंडिया इनवेस्टमेंट मॅनेजर्स प्रायव्हेट लिमिटेड)**
**नोंदणीकृत कार्यालय:** बी/२०४, टॉवर १, पेनिनसुला कॉर्पोरेट पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई ४०००१३,
सीआयएन: U65900MH2007FTC173079
**Bank of India Mutual Fund**

**बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंड (पूर्वीचे बी ओ आय एक्सा म्युच्युअल फंड) व्दारे स्विस चॅलेंज पद्धतीअंतर्गत वित्तीय मालमत्तेची विक्री**

खाली नमूद केलेल्या डिबेंचर्सच्या अधिग्रहणासाठी पात्र वित्तीय संस्थांकडून स्वारस्य अभिव्यक्ती मागविण्यात येत आहेत:

(i) बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंडाने (पूर्वीचे नाव बी ओ आय एक्सा म्युच्युअल फंड) आरकेव्ही एंटरप्रायझेस प्रायव्हेट लिमिटेड (आरकेव्ही) ने जारी केलेल्या सीनीयर सिक्युअर्ड डिबेंचर्स (प्राधान्यक्रम सुरक्षित डिबेंचर्स) मध्ये गुंतवलेले ४००,०००,०००/- रुपये (अक्षरी फक्त चाळीस कोटी भारतीय रुपये) आणि

(ii) बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंड (पूर्वीचे नाव बी ओ आय एक्सा म्युच्युअल फंड) व्दारे ॲक्सिलरेटिंग एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड (एईडीपीएल) मध्ये गुंतवलेले रुपये ११,८४,००,०००/- (फक्त अकरा कोटी चौऱ्याऐंशी लाख भारतीय रुपये) (एकत्रितपणे, **गुंतवणूक** म्हणून संदर्भित).

ही विक्री स्विस चॅलेंज पद्धती अंतर्गत करण्याचे प्रस्तावित असून बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंडला एका गुंतवणूकदाराकडून (**मूळ बोलीदार**) सदर गुंतवणूक खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावावर ही प्रक्रिया आधारित आहे. जर या लिलाव प्रक्रियेत अन्य कोणत्याही बोलीदाराने मूळ बोलीदारापेक्षा जास्त रकमेचा प्रस्ताव दिला, तर त्या सर्वात जास्त रकमेच्या प्रस्तावाशी बरोबरी करण्याचा अधिकार मूळ बोलीदाराला असणार आहे.

बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंडद्वारे यशस्वी बोलीदाराला होणारी ही गुंतवणुकीची विक्री १०० टक्के (शंभर टक्के) रोख स्वरूपात आणि आगाऊ रक्कमेवर पूर्ण केली जाईल आणि ही विक्री *''जशी आहे तशी'' व ''जे काही आहे त्या स्थितीत''* या आधारावर तसेच बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंडावर कोणताही भार न करता पूर्णपणे निकाली काढली जाईल. या गुंतवणुकीशी संबंधित कोणतीही कार्यात्मक, कायदेशीर किंवा अन्य कोणत्याही प्रकारची जोखीम बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंड स्वीकारणार नाही.

पात्र प्रतिस्पर्धी बोलीदारांना खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे:

(i) रीतसर स्वाक्षरी केलेले स्वारस्य पत्र आणि अनामत रक्कम (**इएमडी**);

(ii) रीतसर स्वाक्षरी केलेली आणि शिक्का असलेली गोपनीयता कराराची प्रत आणि ही सर्व प्रक्रिया १३ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी (**स्वारस्य पत्र सादर करण्याची तारीख**) सादर करणे अनिवार्य आहे. जर या वेळेपर्यंत बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंडाला कोणतेही स्वारस्य पत्र (इओआय) प्राप्त झाले नाही, तर या आर्थिक मालमत्तेच्या विक्रीची प्रतिस्पर्धी बोली (काउंटर बिड) प्रक्रिया कोणत्याही पुढील कारवाईशिवाय तातडीने रद्द केली जाईल.

| खात्याचे नाव | ३० सप्टेंबर २०२३ रोजीची एकूण थकबाकी | मूळ बोली | पहिला आव्हानकर्ता बोलीदार | ईएमडी रक्कम |
|---|---|---|---|---|
| आरकेव्ही एंटरप्रायझेस प्रायव्हेट लिमिटेड | भारतीय रुपये ४०,००,००,०००/- एकूण संख्या ४००० दर्शनी मूल्य रु. १००००० ISIN - INE473W07012 | भारतीय रुपये १२,००,००,०००/- (म्हणजेच १०० % (शंभर टक्के) रोख स्वरूपात)) | भारतीय रुपये १३,२०,००,०००/- (म्हणजेच मूळ बोलीवर किमान १०% वाढ) | भारतीय रुपये १,२०,००,०००/- (बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंड यांच्या नावे, मुंबई येथे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात). |
| ॲक्सिलरेटिंग एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड | भारतीय रुपये ११,८४,००,०००/- अ. संख्या ८०० दर्शनी मूल्य रु ७४०००/- ISIN - INE646W07013 ब. संख्या ८०० दर्शनी मूल्य रु ७४०००/- ISIN INE646W07021 | | | |

इच्छुक बोलीदारांनी लेखी स्वरुपातील आपली प्रथम आव्हान बोली (वर दिलेल्या तक्त्यातील रकमेनुसार) विक्रेत्याच्या अधिकृत प्रतिनिधीकडे हाताळणीसाठी admin@ceritudefintech.com या ईमेल पत्त्यावर पाठवावी.

गुंतवणुकीशी संबंधित कागदपत्रे, आवश्यक असल्यास, इच्छुक पक्षांना वर नमूद केल्याप्रमाणे रीतसर स्वाक्षरी केलेले आणि शिक्का मारलेले गोपनीयता हमीपत्र सादर केल्यानंतर त्यांना उपलब्ध करून दिली जातील.

वर नमूद केलेली कागदपत्रे सादर करण्यासाठी, प्रतिस्पर्धी बोलीदारांनी (काउंटर बिडर्स) admin@ceritudefintech.com या पत्त्यावर ई-मेल पाठवावा.

बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंडाने खालील सर्वोच्च अधिकार स्वतःकडे राखून ठेवले आहेत: (i) कोणत्याही व्यक्तीला या बोली प्रक्रियेत सहभागी होण्यापासून रोखणे, तसेच कोणत्याही बोली फेटाळणे (ज्यामध्ये प्रक्रियेच्या अटींचे पालन न करणाऱ्या बोलींचाही समावेश आहे); आणि (ii) कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही कायदेशीर जबाबदारी स्वतःकडे न घेता, ही बोली प्रक्रिया स्थगित करणे, रद्द करणे किंवा त्यामध्ये आणि त्याच्या अटींमध्ये बदल करणे.

बोली प्रक्रियेचे आणि/किंवा तिच्या अटींचे निलंबन, समाप्ती किंवा फेरबदल हे दुसऱ्या वृत्तपत्र/माध्यमातील जाहिरातीद्वारेच केले जाईलच, असे नाही. त्यामुळे, इच्छुक बोलीदारांना विनंती आहे की, बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंडद्वारे बोली प्रक्रियेचे आणि/किंवा तिच्या अटींचे (काही असल्यास) निलंबन, समाप्ती किंवा सुधारणा याविषयी वेळोवेळी माहिती मिळविण्यासाठी त्यांनी बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंडच्या वेबसाइटला नियमितपणे भेट द्यावी.

बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंडला कोणत्याही टप्प्यावर ही विक्री प्रक्रिया थांबवण्याचा किंवा पूर्ण न करण्याचा पूर्ण अधिकार राहणार असून यासाठी त्यांना कोणतेही कारण देण्याची गरज नाही. एकदा प्रतिस्पर्धी बोलीदाराने आपली बोली सादर केल्यानंतर त्यात त्याला कोणताही बदल करता येणार नाही अथवा ती मागे घेता येणार नाही आणि बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंड अशा कोणत्याही विनंतीचा विचार करणार नाही. या विक्री प्रक्रियेशी संबंधित सर्व बाबींमध्ये बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंडचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.

**बँक ऑफ इंडिया इनवेस्टमेंट मॅनेजर्स प्रायव्हेट लिमिटेडसाठी**
**(बँक ऑफ इंडिया म्युचुअल फंडासाठी गुंतवणूक व्यवस्थापक)**
**स्वाक्षरी/-**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**

**स्थान : मुंबई**
**दिनांक : ०७ एप्रिल २०२६**

**म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.**